# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपिल**

**क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.१०३६/२०२१/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.विजय उत्तर अहिरे<br>रा.ॲपल व्हिला, महादेव कॉलनी नं.१, मखमलाबाद रोड, नाशिक ता.जि.नाशिक. | सहकार अधिकारी श्रेणी-१,<br>उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक तालुका यांचे कार्यालय, सहकार संकुल, सारडा सर्कल, नॅशनल उर्दू हायस्कुलजवळ, नाशिक. | उपनिबंधक,<br>उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक तालुका यांचे कार्यालय, सहकार संकुल, सारडा सर्कल, नॅशनल उर्दू हायस्कुलजवळ, नाशिक. |

<u>**द्वितीय अपिल सुनावणी दि.०८/११/२०२३**</u>

| मूळ अर्ज दिनांक | मूळ अर्ज ज.मा.अ. यांना प्राप्त दिनांक | ज.मा.अ. यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०७/१०/२०२० | १३/१०/२०२० | ११/११/२०२० | ०७/१२/२०२० | -- | २४/१२/२०२० |

अपिलार्थी यांनी दि.३१/०३/२०२१ रोजीच्या अर्जान्वये कोणतेही कारण नमूद न करता आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित असून इतर पक्षकार अनुपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०७/१०/२०२० रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "कृपायोग सहकारी गृहनिर्माण संस्थेसंदर्भात एकूण ३ मुद्दयांची" इ. माहिती मागितली आहे.

४. याप्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध असलेली कागदपत्रे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज हा कोविड लॉकडाऊन कालावधीतील आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.११/११/२०२० च्या पत्रान्वये मुद्दा क्र.१ ते ३ बाबतची माहिती ही संस्था स्तरावरील असल्याने व सदर मुद्दयांबाबतचे ठराव व इतर अनुषंगिक कागदपत्रे व माहिती संस्थेने या कार्यालयास सादर केलेली नसल्याने, सदरची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२४/१२/२०२० अन्वये अपिलार्थी यांचे दि.०७/१०/२०२० रोजीचे माहिती अधिकार अर्जान्वये मागणी केलेली माहिती अर्जदार यांना संस्थेने ८ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केले आहेत. अपिलार्थी यांनी याप्रकरणी संबंधित संस्थेला प्रतिवादी केलेले नाही. तसेच अपिलार्थी यांनी

मागणी केलेल्या माहितीबाबत कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नसून अपिलार्थीने देखील द्वितीय अपिलात त्याबाबत काहीही नमूद केलेले नाही.

सबब, याप्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१०३६/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जावक क्र. ओ-८०५ , दिनांक :- 28 MAR 2024

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक